# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# कु. देवयानी जमदाडेस आरडीसी संचलनाचा बहुमान

पाटण, दि. ८ : बाळासाहेब देसाई महाविद्यालयातील एन. एस. एस. विभागातील कु. देवयानी जमदाडे हिची मुंबई येथे २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी निवड होवून तिने महाराष्ट्राचे राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क, मुंबई येथे झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमात या वर्षीच्या आरडीसी संचलनाचा बहुमान मिळविला. याबद्दल कु. देवयानी जमदाडे हिचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.



कु. देवयानी जमदाडे हिचा सत्कार करताना संजीव चव्हाण, सोबत डॉ. शिरीष पवार व इतर.

यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, जिमखाना उपाध्यक्ष डॉ. भरत जाधव, अर्थशास्त्र विभाग-प्रमुख डॉ. प्रशांत फडणीस, एन. एस. एस. अधिकारी डॉ. जी. एस. पट्टेबहादूर उपस्थित होते.

बाळासाहेब देसाई विद्यालयातील एन. एस. एस.मधून मुंबई आरडीसीला जाणारी ती पहिलीच विद्यार्थिनी ठरली आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त मुंबई येथे झालेल्या संचलनासाठी निवड होणे ही सन्मानाची बाब मानली जाते. यात महाराष्ट्रातील सर्व राज्यांमधून निवडक स्वयंसेवक सहभागी होतात.

जवळपास तीन ते चार महिने अगोदरपासून या कॅम्पसाठीची निवडीची प्रकिया सुरू होते. विविध निकष पूर्ण करून मोजकेच स्वयंसेवक या स्टेट कॅम्पसाठी निवडले जातात. सदर निवडीसाठी तिला विभागीय समन्वयक व एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. जी. एस. पट्टेबहादूर, डॉ. एल. एस. भिंगारदेवे यांचे मार्गदर्शन मिळाले.

या यशाबद्दल तिचे कोयना एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाशभाऊ पाटील, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, सर्व प्राध्यापक वर्ग, अधीक्षक विजय काटे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी अभिनंदन केले.